॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे

**✼ सुविचार ✼**
विजय आधी मनात आणि
नंतर रणात मिळवावा लागतो.

अहिल्यानगर | गुरुवार, दि. १८ जून २०२६ | वर्ष ७ वे | अंक १८ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145 | www.veerbhuminews.com

## SPOT NEWS

### ठाकरे गटाच्या बैठकीला राऊतांसह फक्त तीनच खासदार हजर

**● मुंबई** – राजकारणात पुन्हा एकदा २०२२ सारख्या मोठ्या भूकंपाची पुनरावृत्ती होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना पक्षाने बंडखोरी रोखण्यासाठी आणि आपल्या खासदारांची एकनिष्ठता तपासण्यासाठी आज दिल्लीत बोलावलेल्या आपत्कालीन बैठकीत ठाकरे गटाला मोठा झटका बसला आहे. 'थ्री-लाईन व्हिप' जारी करूनही सकाळी ११ वाजता सुरू झालेल्या या बैठकीला संजय राऊतांसह केवळ ३ खासदार उपस्थित राहिले आहेत, तर उर्वरित ६ बंडखोर खासदारांनी या बैठकीकडे साफ पाठ फिरवली आहे, हे स्पष्ट झाले आहे. पक्षातील संभाव्य बंडखोरी मोडून काढण्यासाठी उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार दिल्लीतील जुन्या संसद भवनात ही तातडीची बैठक बोलावण्यात आली आहे. खासदारांची अधिकृत उपस्थिती नोंदवण्यासाठी स्वतंत्र कॉपी (उपस्थिती पुस्तक) तयार करण्यात आली होती. मात्र, या बैठकीला केवळ खालील प्रमुख नेते आणि खासदारच पोहोचू शकले आहेत. संजय राऊत (राज्यसभा खासदार), अनिल देसाई (मुख्य प्रतोद), अरविंद सावंत (लोकसभेतील गटनेते), राजाभाऊ वाजे (नाशिकचे खासदार) या ३ लोकसभा खासदारांव्यतिरिक्त इतर ६ खासदार बैठकीला अनुपस्थित राहिल्याने ठाकरे गटाची धाकधूक कमालीची वाढली आहे. या बैठकीनंतर संजय राऊत आणि अरविंद सावंत हे पुढील रणनीतीसाठी संसदेच्या दिशेने रवाना झाले आहेत.

### देशातील एआय संबंधीत ७० टक्के अभ्यासक्रम फसवे

**● नवी दिल्ली** – देशात येणाऱ्या एकूण नोकऱ्यांच्या रिक्त जागांपैकी सुमारे १४% जागांसाठी थेट आर्टिफिशियल इंटेलिजन्स(एआय) कौशल्याची मागणी केली जात आहे आणि हा वेग सातत्याने वाढत आहे. यामुळेच अक संबंधित कोर्सेसचा पूर आला आहे. पण नैसकॉम आणि इंडीडच्या संयुक्त रीस्किलिंग आणि टेक हायरिंग रिपोर्टनुसार, बाजारात सुरू असलेले सुमारे ७०% कोर्सेस केवळ फसवणूक करत आहेत. प्रत्यक्षात कंपन्यांकडे ४ वर्षांच्या पदवीची वाट पाहण्यासाठी वेळ नाही, त्यामुळे त्या अशा लोकांना लगेच कामावर घेत आहेत जे ३-६ महिन्यांच्या फास्टट्रॅक कोर्सद्वारे या विशिष्ट भूमिकांसाठी तयार होऊन येत आहेत. तथापि, अहवाल असा इशारा देतात की, प्रमाणपत्र विकणाऱ्या बनावट बूटकॅम्पसपासून दूर राहा. बाजार केवळ त्याच फास्ट-ट्रॅक कोर्सला महत्त्व देत आहे, ज्याच्याकडे ३ ते ४ लाइव्ह, डिप्लॉयड पब्लिक प्रोजेक्ट्सचा पोर्टफोलिओ उपलब्ध असेल. १०० टक्के जॉब गॅरंटीच्या दाव्यांमध्ये लपलेल्या अटींबाबत इंडियन स्टाफिंग फेडरेशनच्या कार्यकारी संचालक सुचिता दत्ता यांनी माहिती दिली असून शॉर्ट-टर्म कोर्स नोकरीसाठी पुरेसे आहेत का?मुळीच नाही. बाजार त्यांना पुरस्कृत करतो, ज्यांच्याकडे पारंपरिक पदवीच्या मूलभूत आधारासोबतच व्यावहारिक एआयची समज आणि लाइव्ह प्रोजेक्ट्सचा पोर्टफोलिओ असतो.

# पुणे-साईनगर शिर्डी एक्सप्रेस सुरु

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडून शुभारंभ

**● मुंबई । वीरभूमी–**
पुणे-साईनगर शिर्डी एक्स्प्रेसला आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईतून ऑनलाईन पद्धतीने उपस्थित राहत तर केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पुण्यातून झेंडा दाखवून शुभारंभ केला.



मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानी झालेल्या या कार्यक्रमास विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे उपस्थित होते. पुणे रेल्वे स्थानक येथे केंद्रीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, आमदार विवेक कोल्हे आदी उपस्थित होते.

केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले की, पुणे रेल्वे परिसराची क्षमता वाढविण्यासाठी हडपसर, शिवाजीनगर, खडकी, उरुळी आणि आळंदी परिसरातील विविध रेल्वे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. पुणे जंक्शनचे आधुनिकीकरण, अतिरिक्त प्लॅटफॉर्म उभारणी, आकुर्डी येथे मेगा कोचिंग टर्मिनल; तसेच अत्याधुनिक डिजिटल सिग्नलिंग व्यवस्था यामुळे पुढील तीन ते साडेतीन वर्षांत पुणे रेल्वेची क्षमता दुप्पट होईल आणि सुमारे २० अतिरिक्त गाड्या चालविणे शक्य होणार आहे.

मुंबई-पुणे मार्गावरील तिसरी व चौथी रेल्वे लाईन; तसेच भविष्यातील मुंबई-पुणे आणि पुणे-हैदराबाद बुलेट ट्रेन हे प्रकल्प महाराष्ट्रासाठी मोठी आर्थिक ताकद निर्माण करतील. महाराष्ट्रासाठी रेल्वे अर्थसंकल्पात सुमारे २३,९०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. राज्यातील १२९ स्थानकांचे पुनर्विकास काम सुरू असून त्यापैकी ९३ स्थानकांची कामे पूर्ण झाली आहेत. राज्यात सध्या २४ वंदे भारत सेवा सुरू असून भविष्यात वंदे भारत स्लीपर गाड्यांसह आणखी अनेक आधुनिक रेल्वे सेवा उपलब्ध होणार असल्याचे वैष्णव यांनी सांगितले.

पुणे हे राज्यातील प्रमुख शैक्षणिक, माहिती तंत्रज्ञान आणि औद्योगिक केंद्र असून देशभरातील विद्यार्थी, व्यावसायिक आणि उद्योजकांचे आकर्षण केंद्र आहे. दुसरीकडे, श्री साईबाबांचे पवित्र स्थान म्हणून ओळखले जाणारे शिर्डी हे देशातील प्रमुख तीर्थक्षेत्रांपैकी एक आहे. दररोज लाखो भाविक येथे दर्शनासाठी येत असतात. नव्या रेल्वेसेवेमुळे पुणे आणि परिसरातील भाविकांना अधिक सुरक्षित, परवडणारा आणि आरामदायी प्रवासाचा पर्याय उपलब्ध होणार आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, कुटुंबे आणि समूहाने प्रवास करणाऱ्या भक्तांसाठी ही सेवा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. तसेच अहिल्यानगर आणि शिर्डी परिसरातील नागरिकांना पुण्यातील उच्च शिक्षण आणि वैद्यकीय सुविधांपर्यंत पोहोचणे अधिक सोपे होईल. याशिवाय शिर्डीतील हॉटेल व्यवसाय, वाहतूक सेवा आणि स्थानिक विक्रेत्यांनाही या रेल्वेसेवेचा लाभ मिळून स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे.

पुणे-साईनगर शिर्डी एक्सप्रेसला दौंड कॉर्ड केबिन, श्रीगोंदा, अहिल्यानगर, राहुरी आणि बेलापूर या महत्त्वाच्या स्थानकांवर थांबा देण्यात आला आहे. त्यामुळे या भागातील विद्यार्थी, शेतकरी, व्यापारी, नोकरदार वर्ग आणि संशोधकांच्या प्रवासाची सुविधा वाढणार आहे. राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाशी संबंधित विद्यार्थी व संशोधकांना तर या सेवेचा विशेष लाभ होणार आहे. बेलापूर स्थानकामुळेशनि शिंगणापूर परिसरातील धार्मिक पर्यटनालाही चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

## मोदी-ट्रंप भेट: भारत-अमेरिका संबंधांमध्ये नवा गोडवा

### ट्रम्प यांच्याकडून पंतप्रधान मोदींचे कौतुक

**● नवी दिल्ली । वीरभूमी–**
जी-७ शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात अत्यंत महत्त्वाची द्विपक्षीय बैठक पार पडली. गेल्या काही काळापासून भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंधांमध्ये काहीसा थंडपणा आल्याचे चित्र होते, परंतु या ताज्या भेटीत दोन्ही नेत्यांमधील जवळीक आणि सलोखा स्पष्टपणे दिसून आला. सुमारे १६ महिन्यांनंतर झालेल्या या पहिल्याच भेटीने दोन्ही देशांमधील मैत्री आणि विश्वासाला पुन्हा एकदा नव्याने बळ दिले आहे.

या बैठकीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पंतप्रधान मोदींवर केलेली स्तुतिसुमने. भूतकाळात भारताचा उल्लेख नर्क किंवा मृत अर्थव्यवस्था असा करणाऱ्या ट्रम्प यांचे सूर यावेळी पूर्णपणे बदललेले दिसले. ट्रम्प यांनी मोदींचे कौतुक करताना म्हटले की पंतप्रधान मोदी हे वाटाघाटींमध्ये अत्यंत कडक व्यापारी आहेत, परंतु मनातून ते एखाद्या देवदूतासारखे चांगले आणि सौम्य आहेत. त्यांनी पंतप्रधान मोदींचा मनापासून आदर व्यक्त केला आणि सांगितले की मोदी दिसायला शांत वाटतात, पण चर्चेच्या टेबलावर प्रचंड खंबीर असतात.

ट्रम्प यांनी भारताविषयी आदर व्यक्त करत लवकरच भारत दौरा करणार असल्याचे सांगितले, तसेच भारत आणि अमेरिका यांच्यातील बहुप्रतीक्षित व्यापार करार लवकरच अंतिम टप्प्यात येईल, अशी ग्वाही दिली. मध्य पूर्वेतील शांतता प्रस्थापित करण्यासाठी भारताने दिलेल्या योगदानाचे कौतुक करताना ट्रम्प म्हणाले की, त्यांच्या कार्यकाळात भारतासोबतचे संबंध नेहमीच सर्वोत्तम राहिले आहेत. तसेच, भारतावर कधीही संकट किंवा हल्ला आल्यास अमेरिका भारताच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहील, असे आश्वासनही त्यांनी दिले.

द्विपक्षीय चर्चेदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जागतिक सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला. त्यांनी हार्मुझच्या सामुद्रधुनीतील नाकेबंदी आणि तिथे भारतीय खलाशांवर होणाऱ्या हल्ल्यांकडे ट्रम्प यांचे लक्ष वेधले.

## सामाजिक, राजकीय आंदोलनातील ४४ खटले मागे घेण्याचा मंत्रिमंडळ उपसमितीचा निर्णय

**● मुंबई । वीरभूमी–**
राज्यातील धार्मिक, राजकीय आणि सामाजिक आंदोलनांदरम्यान दाखल झालेले ४४ खटले मागे घेण्याचा निर्णय मंत्रिमंडळ उपसमितीने घेतला असून तशी शिफारस शासनाला करण्यात आली आहे, अशी माहिती सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमता मंत्री तथा या उपसमितीचे अध्यक्ष ॲड. आशिष शेलार यांनी दिली.



राज्यातील राजकीय आणि सामाजिक आंदोलनांदरम्यान दाखल करण्यात आलेले खटले मागे घेण्याबाबत ड. शेलार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली आहे. या समितीची आज सह्याद्री अतिथी गृह येथे बैठक झाली. विधी व न्याय विभागाचे प्रधान सचिव, अभियोग संचालनालयाचे संचालक, गृह विभागाच्या अधिकाऱ्यांसह राज्यातील वरिष्ठ पोलीस अधिकारी बैठकीस उपस्थित होते.

यापूर्वी झालेल्या बैठकीत ७७ खटले मागे घेण्यात आले होते; तर आज ४४ खटले मागे घेण्याची शिफारस करण्यात आली. या समितीच्या बैठकीत पोलिसांकडे दाखल करण्यात आलेल्या १३३ अर्जदारापैकी ४४ अर्जदारांवरील खटले मागे घेण्याबाबत निर्णय घेण्यात आला. त्याचप्रमाणे स्त्रीविषयक गुन्हे, गंभीर स्वरूपाचे खटले, वैयक्तिक व दिवाणी प्रकरणे ही शासनाच्या धोरणांतर्गत माफ केली जाऊ शकत नाहीत. त्यामुळे अशा प्रकरणावरील खटले मागे घेण्यास स्पष्ट नकार देण्यात आला.

मंत्रिमंडळ उपसमितीकडे प्राप्त १३३ अर्जदारापैकी १४ अर्जावर पुन्हा विचार करण्याची शिफारस करण्यात आली असून ही प्रकरणे पोलीस उपायुक्त यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त क्षेत्रीय समितीपुढे ठेवण्यात येतील; तसेच ३५ प्रकरणापैकी काही खटले निकाली निघाले होते तर ३२ खटले हे समितीच्या कार्यकक्षेत न येणारे होते. आज आलेल्या खटल्यापैंकी केवळ ८ खटले प्रलंबित राहिले आहेत.

सामाजिक कार्यकर्ते, राजकीय पक्षांचे कार्यकर्ते, आंदोलक, विचारधारात्मक चळवळींतील सहभागी यांच्यावर विनाकारण खटले दाखल करण्यात आले होते. अशा अनावश्यक खटल्यांपासून त्यांची मुक्तता करणे; हे सरकारचे उत्तरदायित्व असल्याचे मंत्री ड. शेलार यांनी सांगितले.

आज मागे घेण्यात आलेल्या खटल्यांमध्ये गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, दहीहंडी, सामाजिक कार्यक्रम, गोवंश संरक्षण आंदोलन, कामगार आंदोलन अशा विविध खटल्याचा समावेश आहे.

## तिसगाव-पैठण रस्ते प्रकल्पातील निकृष्ट कामाची वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून पाहणी

### रस्त्यात तडे, असमतोल पृष्ठभाग आणि काँक्रीटमध्ये माती आढळल्याने नागरिकांचा संताप

**● शेवगाव । वीरभूमी–**
तिसगाव-पैठण रस्ते प्रकल्पाच्या कामाच्या दर्जाबाबत नागरिकांकडून सातत्याने होत असलेल्या तक्रारींची दखल घेत महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष रस्त्याची पाहणी केली. यावेळी रस्त्याच्या कामातील विविध त्रुटी निदर्शनास आणून देत संपूर्ण कामाची सखोल तांत्रिक तपासणी करण्याची मागणी नागरिकांनी केली.



या पाहणीवेळी शिवसेना नेते अरुण मुंढे, नगरसेवक आशुतोष डहाळे, स्थानिक नागरिक तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. कार्यकारी अभियंता इम्रान शेख, प्राधिकरण अभियंता प्रकाश गोथवाल, पथक प्रमुख प्रियरंजन सिंग, प्रकल्प व्यवस्थापक उदय भार्गव आणि ठेकेदार कंपनीचे अभियंते यांच्या उपस्थितीत रस्त्याच्या कामातील विविध त्रुटी दाखवून देण्यात आल्या.

रस्त्याच्या अनेक भागांमध्ये काँक्रीटला तडे गेलेले असून काही ठिकाणी रस्त्याचा पृष्ठभाग असमतोल झाल्याचे आढळून आले. काम करताना आवश्यक दर्जाचे निकष पाळले गेले नसल्याचा आरोप उपस्थित नागरिकांनी केला.

पाहणीदरम्यान काही ठिकाणी यंत्राच्या सहाय्याने खोदकाम करून प्रत्यक्ष तपासणी करण्यात आली. त्यावेळी काँक्रीटमध्ये माती आढळून आल्याचा दावा नागरिकांनी करत तीव्र नाराजी व्यक्त केली.

जनतेच्या करातून होणाऱ्या विकासकामांमध्ये निकृष्ट दर्जा खपवून घेतला जाणार नाही, असे शिवसेना नेते अरुण मुंढे यांनी स्पष्ट केले. दोषी ठेकेदार व संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करून निकृष्ट काम काढून नव्याने दर्जेदार रस्ता तयार करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली.

यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी नागरिकांच्या तक्रारींची दखल घेत संपूर्ण कामाची सखोल तांत्रिक तपासणी करून नियमानुसार आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

# अहिल्यानगर जिल्ह्यातील तुकाई उपसा जलसिंचन योजनेचे काम १५ जुलैच्या आत पूर्ण करा

## विधानपरिषद सभापती मा. प्रा. राम शिंदे यांचे निर्देश । विधानभवन येथे घेण्यात आलेल्या उच्चस्तरिय बैठकीत सुचना

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ तातडीने उपलब्ध व्हावा यादृष्टीने तुकाई उपसा सिंचन योजनेची प्रलंबित कामे तात्काळ पूर्ण करणे तसेच मिरजगाव येथील भैरवनाथ उपसा सिंचन योजनेचा परिपूर्ण प्रस्ताव मंजूरीसाठी शासनाकडे त्वरीत पाठविण्याचे निदेश विधानपरिषद सभापती मा. प्रा. राम शिंदे यांनी आज दिले. जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्यासमवेत विधानभवन येथे घेण्यात आलेल्या उच्चस्तरिय बैठकीत या योजनांच्या कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. तुकाई उपसा जलसिंचन योजनेची सर्व प्रलंबित कामे वन्यजीव विभागाच्या आवश्यक त्या परवानगीसह १५ जुलैच्या आत पूर्ण करुन या योजनेचा शुभारंभ याच दरम्यान व्हावा आणि कुकडी धरणातील पाण्याचा लाभ या योजनेद्वारे शेतकऱ्यांना मिळावा असेही या बैठकीत निश्चित करण्यात आले.

सभापती प्रा. राम शिंदे यांनी यावेळी तुकाई उपसा सिंचन योजनेच्या कामांची सद्यस्थिती, आर्थिक व भौतिक प्रगती, उर्वरित कामांचे नियोजन तसेच विद्युत, यांत्रिकी आणि स्थापत्य विभागांच्या कामांचा आढावा घेतला. सभापती प्रा. शिंदे यावेळी म्हणाले, कर्जत तालुक्यातील १९ गावांना पिण्याच्या पाण्यासह सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ही योजना महत्त्वाची असून यासाठी कुकडी डाव्या कालव्यातून पाणी उपलब्ध करून देण्याची तरतूद करण्यात आली आहे. हा प्रकल्प महाराष्ट्रासाठी अत्यंत महत्वाचा आहे. मुख्यमंत्री माननीय श्री. देवेंद्र फडणवीस यांचे या प्रकल्पाकडे जातीने लक्ष असून, प्रकल्पासाठी कोणत्याही परिस्थितीत निधीची कमतरता भासणार नाही याकडे लक्ष दिले जात आहे. त्याअनुषंगाने प्रकल्पाशी संबंधित सर्व कामे प्राधान्याने पूर्ण करून, जनसामान्यांना प्रामुख्याने शेतकरी बांधवाना या योजनेचा लाभ लवकरात लवकर मिळेल यादृष्टीने सर्व यंत्रणानी आपसात समन्वय ठेवून कालबद्ध पद्धतीने काम करण्याचे निदेश सभापती मा.प्रा राम शिंदे यांनी यावेळी दिले.

तुकाई उपसा सिंचन योजनेचे एकत्रित काम भौतिकदृष्ट्या सुमारे ९० टक्के पूर्ण झाले आहे. पंपगृह व उर्ध्वगामी नलिकेची कामे सुमारे ९८ टक्के पूर्ण झाली असून वितरण प्रणालीची कामे ७२ टक्के पूर्ण झाली आहेत. उर्वरित कामे लवकर पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले असल्याची माहिती यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी दिली. विद्युत वाहिन्या, पोल उभारणी, भूमिगत केबल तसेच इतर तांत्रिक कामांचाही आढावा यावेळी सभापती प्रा. शिंदे आणि मंत्री श्री राठोड यांनी घेतला.

या बैठकीत मिरजगाव परिसरातील भैरवनाथ उपसा जलसिंचन योजनेवरही सविस्तर चर्चा पार पडली. अवर्षणप्रवण भागातील शेतकऱ्यांना सिंचन सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सीना कालव्यातून पाणी उपसा करून १२ बंधारे भरण्याचा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेअंतर्गत पंपगृह, उर्ध्वगामी वाहिन्या, वितरण वाहिन्या, वितरण कुंड, सौर ऊर्जा निर्मिती तसेच विद्युत पुरवठा यंत्रणा उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. जनहिताच्या दृष्टीने ही योजनाही अत्यंत महत्वाची असून, या योजनेचे सर्वेक्षण, संकल्पन, आरेखन आणि सर्व तांत्रिक बाबिंसह परिपूर्ण प्रस्ताव ऑगस्ट अखेरपर्यंत मंजूरीसाठी सादर झाला पाहिजे असे स्पष्ट निदेश यावेळी सभापती मा. प्रा. राम शिंदे आणि जलसंधारण मंत्री श्री. संजय राठोड यांनी दिले.



बैठकीस जलसंधारण विभागाचे श्री. सचिव जितेंद्र फापळकर, मिरजगावचे सरपंच श्री. नितीन खेतमाळीस यांच्यासह पुणे वन्यजीव विभागाचे उप वनसंरक्षक

श्री. केशव वाबळे (दूरदृष्यप्रणालीद्वारे), पुण्याचे मुख्य अभियंता श्री. नितीन दुसाने, जळगाव येथील तापी गोदावरी जलविद्युत व उपसा सिंचन मंडळाचे अधीक्षक अभियंता श्री. धनंजय दाहेदार, नाशिक येथील मृद जलसंधारण विभागाचे अधीक्षक अभियंता हरिभाऊ गिते, अहिल्यानगर येथील मृद व जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता पांडुरंग गायसमुद्रे, यांत्रिकी विभागाचे कार्यकारी अभियंता डी. वाय. गुळूमकर, नाशिक येथील विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता सु. वि. गांगुर्डे आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

SPOT NEWS



## अगस्ति विद्यालयात विद्यार्थ्यांचा मिकी माउसच्या सहवासात चिमुकल्यांचा आनंदोत्सव

**● अकोले । वीरभूमी –**
येथील अगस्ती एज्युकेशन सोसायटी संचलित अगस्ति विद्यालयात नवीन शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ 'शाळा प्रवेशोत्सवा'ने उत्साहपूर्ण वातावरणात झाला. नवागत विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन, फुलांची उधळण करीत, टाळ्यांच्या कडकडाटात आणि वाद्यांच्या गजरात जंगी स्वागत करण्यात आले. मिकी माउसच्या सहवासात चिमुकल्यांनी मनमुराद आनंद लुटला आणि संपूर्ण परिसर हास्याने फुलून गेला. शैक्षणिक नववर्षाच्या कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने करण्यात आली. तसेच छत्रपती शिवाजी महाराज, अगस्ति शिक्षण संस्थेचे संस्थापक तथा स्वातंत्र्यसेनानी गुरुवर्य बा. ह. नाईकवाडी (बाबा) आणि संस्थेच्या भूतपूर्व सचिव दुर्गाबाई नाईकवाडी (आई) यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास संस्थेच्या अध्यक्षा शैलजा पोखरकर, कार्याध्यक्ष शिरीष नाईकवाडी व सतीश नाईकवाडी, विद्यालयाचे मुख्याध्यापक मंगेश खांबेकर, शिक्षकवृंद, शालेय व्यवस्थापन समिती, सखी सावित्री समिती, महिला सुरक्षा समितीचे पदाधिकारी तसेच मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते. पालक सहविचार सभेमध्ये दहावी, बारावी तसेच शिष्यवृत्ती परीक्षेतील उज्ज्वल निकालाबद्दल शाळेचे कौतुक करण्यात आले. याच शाळेत आमच्या पाल्याचे भवितव्य उज्ज्वल होईल, अशी भावना उपस्थित पालकांनी व्यक्त केली. विद्यालयाच्या गौरवशाली निकालाची परंपरा लक्षात घेऊन यंदाही इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंत मोठ्या प्रमाणात प्रवेश झाल्याची माहिती मुख्याध्यापक मंगेश खांबेकर यांनी दिली. नवागत विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि उत्साह पाहून शिक्षकवर्गही भारावून गेला.

## कल्याण रोड परिसरात पोलीस गस्त वाढविण्याची मागणी

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
अहिल्यानगर शहरातील कल्याण रोड परिसरात घरफोडी, चोरी आणि इतर गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ होत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः गणेशनगर, माधवनगर, भावना-ऋषी सोसायटी आणि साईराम सोसायटी परिसरातील रहिवाशांनी आपल्या सुरक्षेबाबत चिंता व्यक्त करत पोलीस प्रशासनाने या भागात गस्त वाढवावी, अशी मागणी केली आहे. या पार्श्वभूमीवर नगरसेवक पै. महेश लोंढे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने शहराचे विभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांची भेट घेऊन या मागणीचे निवेदन सादर दिले. यावेळी परिसरातील नागरिक उपस्थित होते. वाढत्या गुन्हेगारी घटनांमुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना आणि परिसरातील कायदा व सुव्यवस्थेबाबतच्या समस्या याकडे शिष्टमंडळाने अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, कल्याण रोड भागातील गणेशनगर, माधवनगर, भावना-ऋषी सोसायटी आणि साईराम सोसायटी परिसरात मागील काही काळात घरफोडी, चोरी तसेच इतर गुन्हेगारी प्रकारांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे नागरिकांच्या मनात भीती निर्माण झाली असून विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. परिसरातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी नियमित पोलीस पेट्रोलिंग वाढविणे, रात्रीच्या वेळी विशेष गस्त पथके तैनात करणे, संशयास्पद हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवणे तसेच आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे गरजेचे आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलीस प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून नियमित गस्त वाढवावी, अशी मागणी निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## शहरातील आगरकर मळा, काटवण खंडोबा रोड परिसराचा पाणी प्रश्न तीव्र

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
शहरातील प्रभाग क्रमांक १५ मधील आगरकर मळा, आनंदनगर, सागर कॉम्प्लेक्स तसेच काटवण खंडोबा रोड परिसरात गेल्या दोन महिन्यांपासून पाणीपुरवठा गंभीरपणे विस्कळीत झाला असून, नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून प्रभावी उपाययोजना होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा विभाग प्रमुख परिमल निकम यांना निवेदन देऊन परिसरातील समस्यांकडे लक्ष वेधण्यात आले. यावेळी अमोल गाडे, माजी नगरसेवक सुनील काळे, नगरसेवक दत्ता गाडळकर, सुजय मोहिते, माजी नगरसेवक विजय गव्हाळे आदी उपस्थित होते. निवेदनाद्वारे पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# श्रीगोंदा येथील सती स्मारक शिलालेख उजेडात

### अठराव्या शतकातील सतीप्रथा व सामाजिक इतिहासाचा महत्त्वपूर्ण पुरावा

■ **विजय उंडे**

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**
अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा शहरातील खंडोबा मंदिराशेजारी असलेल्या लिंगेश्वर महादेव मंदिरासमोरील शेतामध्ये एक महत्त्वपूर्ण सती स्मारक शिलालेख आढळून आला असून, तो अठराव्या शतकातील धार्मिक, सामाजिक आणि कौटुंबिक इतिहासाचा महत्त्वपूर्ण पुरावा ठरत आहे.

हा शिलालेख एका सती समाधी स्मारकाच्या उजव्या बाजूच्या स्तंभावर कोरलेला असून तो देवनागरी लिपीतील मराठी भाषेत लिहिलेला आहे. शिलालेख नऊ ओळींचा असून अनेक वर्षे उघड्यावर राहिल्यामुळे त्यावरील अक्षरे पुसट झाली आहेत. तसेच सततच्या रंगरंगोटीमुळे काही अक्षरे बुजून गेली होती. मात्र लेखावरील रंग काढून छाप घेतल्यानंतर अथक प्रयत्नातून शिलालेखाचा मजकूर वाचण्यात संशोधकांना यश आले. शिलालेखाचे संशोधक राजेश पोपट इंगळे असून वाचन अनिल किसन दुधाणे यांनी केले आहे.

शिलालेखामध्ये श्री गणेश चरणी तत्पर असा उल्लेख आढळून येतो. तसेच महादेव गोपाळ आलेकर आणि त्यांची पत्नी सती तुळसा भीमाबाई आलेकर यांची नोंद करण्यात आली आहे. शालिवाहन शके १६९७, मन्मथ नाम संवत्सर असा कालोल्लेख या लेखात असून त्यानुसार हा शिलालेख इ.स. १७७५ च्या आसपासचा असल्याचे स्पष्ट होते.

शिलालेखाचा आशय असा की, श्री गणेशाच्या चरणी तत्पर असलेले महादेव गोपाळ आलेकर यांच्या पत्नी तुळसा भीमाबाई आलेकर या सती गेल्यानंतर त्यांच्या स्मरणार्थ हे स्मारक उभारण्यात आले.

या शिलालेखामुळे त्या काळातील सतीप्रथेचा स्थानिक पातळीवरील ऐतिहासिक पुरावा उपलब्ध झाला आहे. पतीच्या निधनानंतर पत्नीने सती जाण्याची प्रथा त्या काळी समाजमान्य होती आणि त्याच्या स्मरणार्थ सतीशिला किंवा सतीस्तंभ उभारण्याची परंपरा महाराष्ट्रातील विविध भागांत प्रचलित होती. हा शिलालेख त्याच परंपरेचा एक जिवंत पुरावा मानला जात आहे.

लेखाच्या प्रारंभी आलेला श्री गणेश चरणी तत्पर हा उल्लेख त्या काळातील गणेशभक्ती, धार्मिक श्रद्धा आणि समाजजीवनातील आध्यात्मिक भावनांचे दर्शन घडवतो. तसेच आलेकर कुटुंबातील महादेव गोपाळ आलेकर व तुळसा भीमाबाई आलेकर यांच्या नावांची नोंद स्थानिक घराण्यांच्या इतिहासाच्या अभ्यासासाठीही महत्त्वाची ठरत आहे.

इतिहास अभ्यासकांच्या मते, शके १६९७ मन्मथ संवत्सर या उल्लेखामुळे लेखाचा कालखंड निश्चित होतो आणि तो मराठा कालखंडाशी जोडता येतो. त्यामुळे अठराव्या शतकातील सामाजिक रचना, धार्मिक परंपरा आणि स्त्रियांचे स्थान यांचा अभ्यास करण्यासाठी हा शिलालेख महत्त्वपूर्ण संदर्भ ठरतो.

या शिलालेखाचे शोधकार्य, छायाचित्रण व छाप घेण्याच्या कार्यात शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनचे अध्यक्ष राजेश इंगळे, मारुती वागस्कर, दिगंबर भुजबळ आणि सचिन भोसले यांनी सहकार्य केले.

पतीबरोबर सती गेल्याचे प्रतीक म्हणून समाधी बांधून स्मृती जपण्याची परंपरा त्या काळी अस्तित्वात होती. हा शिलालेख केवळ धार्मिक नोंद नसून आलेकर कुटुंबाचा इतिहास, सती परंपरा आणि तत्कालीन सामाजिक जीवन समजून घेण्यासाठी महत्त्वाचा पुरावा आहे, असे मत शिलालेख वाचक अनिल दुधाणे यांनी व्यक्त केले.



## प्रा. किसन चव्हाण यांच्या पाठपुराव्याने मयत देविदास तुजारे यांच्या कुटुंबाला चार लाखांची मदत

**● शेवगाव । वीरभूमी –**
तालुक्यातील वरुर येथील युवक देविदास कचरू तुजारे यांच्या दुर्दैवी मृत्यूनंतर त्यांच्या कुटुंबाला आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी करण्यात आलेल्या पाठपुराव्याला यश आले असून, महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कुटुंबीयांना चार लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द केला. या मदतीमागे वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा. किसन चव्हाण यांनी घेतलेल्या आक्रमक भूमिकेची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली.



देविदास तुजारे यांचा ११ जून रोजी विद्युत खांबावर वीज जोडणीचे काम करत असताना अचानक वीजप्रवाह सुरू झाल्याने विजेचा धक्का बसून जागीच मृत्यू झाला होता. ते महावितरणचे नियमित कर्मचारी नसले तरी अनेक वर्षांपासून वायरमनसोबत काम करत होते. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने या घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त होत होती.

घटनेची माहिती मिळताच वरुर येथील ग्रामस्थ व सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रा. किसन चव्हाण यांच्याशी संपर्क साधला. त्यानंतर त्यांनी तातडीने ग्रामीण रुग्णालयात धाव घेत कुटुंबीयांची भेट घेतली. मयताच्या कुटुंबाला आर्थिक व शासकीय मदत मिळावी, यासाठी ग्रामस्थ, नातेवाईक आणि वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांसह महावितरण कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले.

यावेळी प्रा. चव्हाण यांनी अधिकाऱ्यांसमोर आक्रमक भूमिका घेत मयताच्या कुटुंबाला तातडीने मदत देण्याची मागणी केली. मदतीबाबत सकारात्मक निर्णय न झाल्यास देविदास तुजारे यांचा अंत्यसंस्कार महावितरण कार्यालय परिसरात करण्याचा इशाराही त्यांनी दिला. या भूमिकेमुळे प्रशासन आणि महावितरण अधिकाऱ्यांनी तातडीने दखल घेत कुटुंबाला मदत देण्याचे आश्वासन दिले.

यानंतर मंगळवारी देविदास तुजारे यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. बुधवारी महावितरणचे अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत मयताच्या कुटुंबीयांना चार लाख रुपयांचा धनादेश प्रा. किसन चव्हाण यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. तसेच शासनाच्या विविध योजनांमधूनही कुटुंबाला मदत मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले.

या प्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष प्यारेलाल शेख, विनोद मोहिते, मधुकर वावरे, बाळासाहेब तुजारे, लक्ष्मण मोरे यांच्यासह ग्रामस्थ, नातेवाईक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कोपरगावचे व्यापारी सुधीर डागा यांची महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या गव्हर्निंग कौन्सिल सदस्यपदी निवड

**● कोपरगाव । वीरभूमी –**
कोपरगाव तालुका व्यापारी महासंघाचे कार्याध्यक्ष तथा बालाजी सुपर मार्केटचे संस्थापक सुधीर डागा यांची महाराष्ट्रातील व्यापारी, उद्योजक आणि उद्योग क्षेत्रातील सर्वोच्च संघटना असलेल्या महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चरच्या गव्हर्निंग कौन्सिल सदस्यपदी निवड झाल्याने कोपरगाव तालुक्यासह संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यातील व्यापारी वर्गामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. अशी माहिती कोपरगाव तालुका व्यापारी महासंघाचे सचिव प्रदीप साखरे यांनी दिली.



दरम्यान, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या अध्यक्षपदी सांगलीचे प्रसिद्ध उद्योजक रवींद्र मानगावे, तर उपाध्यक्षपदी महेंद्र अग्रवाल (धुळे) आणि वरिष्ठ उपाध्यक्षपदी कमलाकर शेट्टी यांची निवड झाली आहे. नव्या कार्यकारिणीच्या माध्यमातून राज्यातील व्यापार व उद्योग क्षेत्राला चालना देण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

याबाबत अधिक माहिती देताना व्यापारी महासंघाचे उपाध्यक्ष अजित लोहाडे म्हणाले की, सुमारे चाळीस वर्षांपूर्वी व्यापारी महासंघाचे अध्यक्ष ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांची देखील महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्समध्ये गव्हर्निंग कौन्सिल सदस्य पदी निवड झाली होती. त्यांनी या पदावर कार्यरत राहून कोपरगावच्या व्यापारी वर्गाचे प्रतिनिधित्व केले होते. त्यानंतर तब्बल चार दशकांनंतर कोपरगावसारख्या ग्रामीण भागातील व्यापाऱ्याला या प्रतिष्ठित संस्थेमध्ये प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली आहे. त्यामुळे स्थानिक व्यापार क्षेत्राला राज्यस्तरावर प्रभावी व्यासपीठ मिळणार असून व्यापाऱ्यांच्या विविध प्रश्नांना न्याय मिळण्यास मदत होणार आहे.

सुधीर डागा यांनी गेल्या अनेक वर्षांपासून किरकोळ व्यापार, ग्राहक हित आणि व्यापाऱ्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने काम केले आहे. त्यांनी मांडलेली 'वन रेट, वन वेट, वन नेशन' ही संकल्पना राज्यभर चर्चेचा विषय ठरली आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सने त्यांना सदस्यपदाची संधी दिली असून ही त्यांच्या कार्याची पावती असल्याचे तालुका व्यापारी महासंघाचे खजिनदार तुलसीदास खुबानी यांनी सांगितले.

याच अनुषंगाने महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या 'गाव तेथे उद्योजक' या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत कोपरगावमध्ये यापूर्वी यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आलेल्या 'मेक इन कोपरगाव' या उपक्रमाचे पुढील टप्प्यात अधिक व्यापक स्वरूपात आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती हर्षल कृष्णानी आणि मानव शुक्ला यांनी दिली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून स्थानिक उद्योजक, स्टार्टअप्स, महिला उद्योजक, युवा व्यावसायिक आणि शेतकरी उत्पादक गटांना एकत्र आणून रोजगारनिर्मिती व उद्योगवृद्धीस चालना देण्याचा मानस व्यक्त करण्यात आला.

सुधीर डागा यांच्या निवडीबद्दल कोपरगाव तालुका व्यापारी महासंघ, किराणा मर्चंट असोसिएशन तसेच विविध व्यापारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले असून त्यांच्या माध्यमातून कोपरगावच्या व्यापारी वर्गाचा आवाज राज्यस्तरावर अधिक प्रभावीपणे पोहोचेल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

## पारनेर तहसील कार्यालय व पोलीस ठाणे परिसरात बेशिस्त वाहनांचा विळखा

### शासकीय कार्यालयांच्या आवारातच वाहतूक नियमांची पायमल्ली; नागरिकांकडून 'नो पार्किंग' झोनची मागणी

**● पारनेर । वीरभूमी–**
तालुक्यातील प्रशासनाचा कणा मानल्या जाणाऱ्या पारनेर तहसील कार्यालय आणि पोलीस ठाणे परिसरातच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. या दोन्ही महत्त्वाच्या शासकीय कार्यालयांच्या आवारात बेशिस्तपणे वाहने उभी करण्यात येत असल्याने सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. एकीकडे पोलीस प्रशासन शहरात वाहतूक नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई करत असताना, शासकीय कार्यालयांच्या परिसरातील या समस्येकडे मात्र दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

तालुक्यातील विविध भागांतून दररोज शेकडो नागरिक कामानिमित्त तहसील कार्यालय आणि पोलीस ठाण्यात येत असतात. मात्र, या कार्यालयांच्या प्रवेशद्वारासह परिसरात चारचाकी आणि दुचाकी वाहनांची मोठी गर्दी होत असल्याने पायी चालणेही अवघड बनले आहे. त्यामुळे नागरिकांना कार्यालयात पोहोचण्यासाठी अक्षरशः तारेवरची कसरत करावी लागत आहे.

विशेष म्हणजे, पोलीस प्रशासन आणि वाहतूक शाखेकडून पारनेर बसस्थानक परिसर तसेच सुपा रोडवर वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर नियमितपणे कारवाई करण्यात येते. ऑनलाइन दंडही आकारला जातो. मात्र, हीच शिस्त तहसील कार्यालय आणि पोलीस ठाण्याच्या आवारात का पाळली जात नाही, असा प्रश्न आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. शासकीय कार्यालयांच्या परिसरात बिनधास्तपणे उभ्या असलेल्या वाहनांवर कोणतीही कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.



शासकीय कार्यालयांच्या समोरच वाहनांचा असा विळखा पडल्याने आपत्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिका किंवा इतर महत्त्वाच्या वाहनांना मार्ग काढणे कठीण होऊ शकते. त्यामुळे प्रशासकीय अधिकारी आणि पोलीस प्रशासनाने वेळीच याकडे लक्ष देऊन तहसील कार्यालय व पोलीस ठाणे परिसर 'नो पार्किंग' झोन घोषित करावा आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या शासकीय कार्यालयांच्या आवारातच वाहतूक नियमांची पायमल्ली होत असेल, तर कायदा व शिस्तीचा संदेश नागरिकांपर्यंत कसा पोहोचणार, असा सवालही जागरूक नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# घरातही 'मोबाईल पार्किंग'ची व्यवस्था करा : शिक्षण उपसंचालक ज्योती परिहार

### सोशल मीडियाच्या वाढत्या गैरवापरामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांवर व्यक्त केली चिंता

**● पाथर्डी । वीरभूमी –**
सध्या सोशल मीडियावर बहुमूल्य वेळ खर्च होत असून, त्याच्या वाढत्या गैरवापरामुळे अनेक समस्या निर्माण होत आहेत. त्यामुळे घरासमोर वाहने लावण्यासाठी जशी पार्किंगची व्यवस्था केली जाते, त्याचप्रमाणे घराच्या आतही 'मोबाईल पार्किंग'ची सुविधा करणे अत्यंत गरजेचे असल्याचे मत पुणे शिक्षण विभागाच्या सहाय्यक उपसंचालक ज्योती परिहार यांनी व्यक्त केले.

शहरातील तिलोक जैन विद्यालयात शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी आयोजित कार्यक्रमात त्या विशेष अतिथी म्हणून उपस्थित होत्या. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पुणे शिक्षण विभागाचे कनिष्ठ प्रशासकीय अधिकारी बाबुराव जाधव, गटशिक्षणाधिकारी शिवाजी कराड, संस्थेचे सचिव सतीश गुगळे, खजिनदार सुरेश कुंचेरिया, प्राचार्य अजय भंडारी, उपप्राचार्य अशोक गर्जे, तसेच सुधाकर सातपुते, महेंद्र राजगुरू, नंदिनी मुथ्था आणि मनीषा मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना परिहार म्हणाल्या की, पालकांनी अपेक्षांचे ओझे मुलांवर टाकून त्यांना रेसच्या घोड्यासारखे बनविण्यापेक्षा, जगाच्या पाठीवर कुठेही गेल्यावर कोणत्याही संकटावर मात करून त्यातून सहज मार्ग काढत यशस्वी जीवन जगता येईल, अशा प्रकारचे संस्कार मुलांवर व्हायला हवेत. अनेक विद्यार्थी सर्वाधिक गुण मिळवूनही कधीकधी आयुष्याच्या परीक्षेत अपयशी ठरतात. त्यामुळे केवळ गुणांकडे लक्ष न देता विद्यार्थ्यांच्या भविष्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

अभ्यास महत्त्वाचा असला, तरी त्याचबरोबर आजूबाजूच्या माणसांनाही 'वाचता' आले पाहिजे. त्यामुळे जीवन जगताना आर्थिक, मानसिक, शारीरिक किंवा इतर कोणत्याही प्रकारची हानी टाळता येते. विशेष म्हणजे, सध्या सोशल मीडियामुळे विद्यार्थी घडण्यापेक्षा अधिक प्रमाणात बिघडत असल्याचे दिसून येते. त्यामुळे सोशल मीडियावर किती वेळ खर्च करायचा याची मर्यादा निश्चित करणे आवश्यक आहे. घरामध्ये मोबाईलवर कमी वेळ घालवून, चर्चेला, एकमेकांच्या अडीअडचणी समजून घेऊन त्या सोडवण्यासाठी अधिक वेळ देण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थी व पालकांना केले.

यावेळी बोलताना संस्थेचे सचिव सतीश गुगळे म्हणाले की, या संस्थेत शिक्षणासाठी पालकांनी दाखविलेल्या विश्वासाबद्दल ते आभारी आहेत. प्रचंड वेगाने बदलणाऱ्या जागतिक घडामोडींमध्ये या संस्थेतील विद्यार्थी कुठेही कमी पडणार नाहीत, तर जगाच्या बरोबरीने किंवा एक पाऊल पुढे राहतील, यासाठी संस्था सातत्याने प्रयत्नशील राहील, असे त्यांनी सांगितले. तसेच पालक व विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.

प्राचार्य अजय भंडारी म्हणाले की, गौरवशाली परंपरा असलेल्या या संस्थेतून अनेक विद्यार्थी राज्यासह देशाच्या कानाकोपऱ्यात विविध क्षेत्रांत कार्यरत आहेत. संस्थाचालक, शिक्षक आणि पालक यांच्या समन्वयातून विविध उपक्रम राबविले जातात. या उपक्रमांचा लाभ घेऊन विद्यार्थी उत्तुंग भरारी घेतील, यासाठी आम्ही नियमित प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अनिल पानखडे यांनी केले. सूत्रसंचालन विवेक सातपुते यांनी केले, तर आभार भारत गाडेकर यांनी मानले.

## SPOT NEWS



## कोपरगावात राष्ट्रवादीच्या वतीने राजमाता जिजाऊ यांना अभिवादन

**● कोपरगाव । वीरभूमी –**

स्वराज्याच्या शिल्पकार तथा छत्रपती शिवाजी महाराजांच्या मातोश्री राजमाता जिजाऊ यांच्या स्मृतीदिनानिमित्त कोपरगाव शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आमदार आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी राजमाता जिजाऊ यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचे स्मरण केले. यावेळी नगरसेविका गटनेत्या सौ.गौरी पहाडे, सौ. निर्मला आढाव, माजी नगरसेविका सौ. मायादेवी खरे, नगरसेवक हाजी मेहमूद सय्यद, राजेंद्र वाकचौरे, इम्तियाज अत्तार, शैलेश साबळे, संदिप कपिले, बाळासाहेब रुईकर, मंदार पहाडे, सोमेश आढाव, गोदावरी खोरे केन ट्रान्सपोर्ट कंपनीचे संचालक प्रदीप कुऱ्हाडे, माजी नगरसेवक रमेश गवळी, बाळासाहेब आढाव, दिनकर खरे, अशोक आव्हाटे, सचिन परदेशी, मनोज नरोडे, मुकुंद भूतडा, जावेद शेख, धनंजय कहार, ठकाजी लासुरे, विकास बेंद्रे, राजेंद्र खैरनार, राजेंद्र उशिरे, राजेंद्र बोरावके, योगेश वाणी, शिवाजी लकारे, सिद्धार्थ शेळके, मयुरेश शिंदे, रविंद्र राऊत, वैभव कानडे, प्रशांत मोरे, उमेश दिक्षित आदींसह नागरिक उपस्थित होते.

## पाथर्डीतील जुन्या बसस्थानकावरुन मंगळसुत्राची चोरी; ४० हजारांचा ऐवज लंपास

**● पाथर्डी । वीरभूमी –**

पाथर्डी येथील जुन्या बसस्थानकावर मुंबई-गेवराई बसमध्ये चढत असताना एका महिलेच्या गळ्यातील सुमारे ४० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना घडली. याप्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, तालुक्यातील तुळजवाडी येथील सत्यभामा कराड यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि. १५ जून २०२६ रोजी दुपारी साडेचारच्या सुमारास त्या पाथर्डी येथील जुन्या बसस्थानकातून मुंबई-गेवराई बसमध्ये प्रवासासाठी चढत होत्या. त्यावेळी बसमध्ये मोठ्या प्रमाणावर गर्दी असल्याने प्रवाशांची चेंगराचेंगरी होत होती. बसमध्ये चढून आसनावर बसल्यानंतर काही वेळाने त्यांच्या लक्षात आले की, गळ्यातील सुमारे चार ग्रॅम वजनाचे व अंदाजे ४० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र गायब झाले आहे. त्यानंतर त्यांनी परिसरात शोधाशोध केली; मात्र दागिना मिळून आला नाही. बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने मंगळसूत्र चोरून नेल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणी संबंधित महिलेच्या फिर्यादीवरून पाथर्डी पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करत आहेत. या घटनेमुळे बसस्थानक परिसरात तसेच सार्वजनिक वाहतुकीत प्रवास करणाऱ्या नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. गर्दीच्या ठिकाणी मौल्यवान दागिने व वस्तूंची विशेष काळजी घेण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे.

## सुभद्रा फलके यांचे निधन

**● शेवगाव । वीरभूमी –**

येथील सुभद्रा शरदचंद्र फलके (वय ७७) यांचे प्रदीर्घ आजाराने अहिल्यानगर येथे निधन झाले.



सुभद्रा फलके या स्व. आ. पांडुरंग यशवंत फलके यांच्या स्नुषा होत. धार्मिक वृत्ती, मनमिळाऊ स्वभाव आणि आपुलकीच्या वागणुकीमुळे त्या सर्वांच्या परिचयाच्या होत्या. कुटुंब, समाज आणि नातेसंबंध जपणाऱ्या व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या पश्चात नागपूर खंडपीठ, उच्च न्यायालय येथे न्यायमूर्ती म्हणून कार्यरत असलेल्या उर्मिला फलके, अर्चना फलके या दोन मुली, बांधकाम व्यावसायिक मयूर फलके हा मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर फलकेवाडी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# महावितरणच्या ढिसाळ कारभारावर आ. आशुतोष काळे आक्रमक

### विजेचे वाकलेले पोल आणि वीज वाहिन्या तातडीने दुरुस्त करण्याचे निर्देश

**● कोपरगाव । वीरभूमी–**

मागील महिन्यात तालुक्यात वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाल्याने धामोरी गावासह परिसरात अनेक ठिकाणी विजेचे पोल जमिनीला टेकले आहेत तर अनेक पोल वाकले होते तर अनेक ठिकाणी वीज वाहिन्यांवर झाडे कोसळल्यामुळे वीज वाहिन्या तुटून शेतात पडल्या आहेत तर काही ठिकाणी अजूनही लोंबकळत आहेत ज्या सहजपणे हाताला लागतात.जवळपास तीन आठवड्यांचा कालावधी होवूनही महावितरणकडून हे पोल सरळ करण्याचे आणि वीज वाहिन्यांच्या दुरुस्तीचे काम पूर्ण झाले नसून सुरु असलेले दुरुस्तीचे काम अतिशय कमी मनुष्यबळात अत्यंत संथ गतीने सुरू असल्याचे दिसून आल्यामुळे आमदार आशुतोष काळे संतप्त झाले. त्यांनी आक्रमक पवित्रा घेत महावितरणाच्या उपकार्यकारी अभियंता, कनिष्ठ अभियंत्याला आणि ठेकेदाराला कडक शब्दात चांगलेच सुनावले आहे.



आमदार आशुतोष काळे यांनी मंगळवार (दि.१६) रोजी मागील महिन्यात वादळी वाऱ्यासह जोरदार पावसामुळे विजेचे पोल व वीज वाहिन्यांच्या झालेल्या नुकसानीच्या दुरुस्तीच्या कामाची नागरीकांसमवेत प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पाहणी केली. त्यावेळी तीन आठवड्याच्या कालावधीत महावितरणकडून दुरुस्तीचे काम पूर्ण झालेले नसल्याचे व ठिकठिकाणी वाकलेले पोल व जमिनीलगत पडलेल्या वीज वाहिन्या व काही ठिकाणी लोंबकळत असणाऱ्या वीज वाहिन्या ज्या सहजासहजी हाताला लागतील अशा परिस्थितीत दिसून आल्यामुळे आमदार आशुतोष काळे चांगलेच संतापले होते. वाकलेले पोल व लोंबकळत असणाऱ्या वीज वाहिन्या तुम्हाला दिसत नाही का? तुमच्या ढिसाळ कारभारामुळे शेतकऱ्यांना व वीज ग्राहकांना किती अडचणींचा सामना करावा लागतो याची जाणीव आहे का? ऑफिसमध्ये बसून तुम्हाला शेतकऱ्यांच्या अडचणी समजणार नाहीत. त्यामुळे प्रत्यक्षात जागेवर जावून परिस्थितीची पाहणी करा आणि परिस्थितीचे गांभीर्य ओळखून काम किती तातडीने पूर्ण झाले पाहिजे याचा गांभीर्याने विचार करा.

दुरुस्तीचे काम किती मोठे आहे त्या कामासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून न देता केवळ दोन ते तीनच कामगार दुरुस्तीच्या कामासाठी देता यावरून तुम्हाला वीज ग्राहकांच्या अडचणींशी काहीच देणे घेणे नाही असे दिसते. मात्र यापुढे असा ढिसाळ कारभार मला चालणार नाही. नागरीकांच्या तुमच्या बाबतीत पुन्हा तक्रारी आल्यास त्याचे परीणाम तुम्हाला भोगावेच लागतील अशा कडक शब्दात आमदार आशुतोष काळे यांनी महावितरणाच्या उपकार्यकारी अभियंता, कनिष्ठ अभियंत्याला आणि ठेकेदाराची कान उघाडणी केली. तसेच कार्यकारी अभियंत्याला पाहणी दरम्यान भ्रमणध्वनीवरून आवश्यक साहित्य, मनुष्यबळ व यंत्र सामुग्री तातडीने उपलब्ध करून देण्याच्या सूचना केल्या.

येत्या काही दिवसात पावसाला सुरवात होणार असून वाकलेले पोल आणि लोंबकळणाऱ्या वीज वाहिन्यांमुळे मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पाऊस सुरु होण्यापूर्वी रवंदे, मळेगाव थडी, सांगवी भुसार, मायगाव देवी आणि धामोरी गावातील काम युद्धपातळीवर पूर्ण करण्याच्या सूचना आ.आशुतोष काळे यांनी महावितरणाच्या अधिकाऱ्यांना दिल्या आहे. कामचुकार अधिकाऱ्यांच्या बाबतीत आमदार आशुतोष काळे यांच्या या भूमिकेचे नागरीकांनी स्वागत केले असून नाठाळ अधिकाऱ्यांना यापुढे नागरीकांच्या अडचणी सोडविण्यासाठी चालढकल करता येणार नाही.

## अतिक्रमण हटाव मोहिमेत बाधित दुकानदारांना गाळे वाटपात प्राधान्य द्या : नगरसेवक आशुतोष डहाळे

### लहान व्यावसायिकांच्या पुनर्वसनासाठी नगराध्यक्षा माया मुंढे यांच्याकडे निवेदन

**● शेवगाव । वीरभूमी–**



शहरातील अतिक्रमण हटाव मोहिमेमुळे व्यवसायावर परिणाम झालेल्या लहान दुकानदार व व्यावसायिकांच्या पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण झाला असून, बाधित दुकानदारांना नगरपरिषदेच्या उपलब्ध गाळ्यांच्या वाटपात प्राधान्य देण्यात यावे, अशी मागणी नगरसेवक तथा शिवसेना तालुकाप्रमुख आशुतोष डहाळे यांनी नगराध्यक्षा माया अरुण मुंढे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, शेवगाव शहरामध्ये नुकतीच नगरपरिषदेच्या वतीने अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात आली. या कारवाईमध्ये रस्त्यालगत व्यवसाय करणारे अनेक छोटे दुकानदार व व्यावसायिक बाधित झाले आहेत. अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह या छोट्या व्यवसायांवर अवलंबून असल्याने कारवाईनंतर त्यांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला आहे.

शहराचा विकास आणि वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी अतिक्रमण हटाव मोहीम आवश्यक असली, तरी या कारवाईमुळे विस्थापित झालेल्या व्यावसायिकांच्या उपजीविकेचाही विचार करणे गरजेचे आहे. त्यामुळे नगरपरिषदेने उपलब्ध करून दिलेल्या गाळ्यांच्या वाटप प्रक्रियेत अतिक्रमण हटाव मोहिमेमुळे बाधित झालेल्या दुकानदारांना प्रथम प्राधान्य द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच संबंधित दुकानदारांना व्यवसायासाठी योग्य जागा उपलब्ध करून देऊन त्यांचे पुनर्वसन करण्याबाबत नगरपरिषदेने सकारात्मक निर्णय घ्यावा. यामुळे छोटे व्यावसायिक पुन्हा उभे राहू शकतील आणि त्यांच्या कुटुंबांचा रोजगार सुरळीत राहण्यास मदत होईल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

नगरपरिषदेने बाधित दुकानदारांच्या परिस्थितीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून लवकरात लवकर कार्यवाही करावी, अशी विनंती नगरसेवक आशुतोष डहाळे यांनी नगराध्यक्षा माया मुंढे यांच्याकडे केली आहे.

## जबरी चोरी प्रकरणातील आरोपीस श्रीगोंदा पोलिसांकडून अटक

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

श्रीगोंदा शहरातील सिद्धार्थ नगर परिसरात जबरी चोरी, मारहाण व कोयत्याचा धाक दाखवून धमकी दिल्याप्रकरणी श्रीगोंदा पोलिसांनी एका आरोपीस अटक केली आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दि. १६ जून रोजी रात्री सुमारे अडीच वाजेच्या सुमारास फिर्यादी रूपाली नितीन वायदंडे (रा. ससाणे नगर, श्रीगोंदा) यांचे पती नितीन वायदंडे यांना अचानक पोटदुखीचा त्रास सुरू झाल्याने ते औषध आणण्यासाठी मेडिकलकडे जात होते. त्यावेळी सिद्धार्थ नगर परिसरात आरोपी पियुष बाळासाहेब घोडके (रा. सिद्धार्थ नगर, श्रीगोंदा) व त्याच्या एका अनोळखी साथीदाराने त्यांना अडवून पैशांची मागणी केली.

पैसे देण्यास नकार दिल्यानंतर आरोपींनी नितीन वायदंडे यांना जबर मारहाण करून त्यांच्याकडील एक हजार रुपये जबरदस्तीने काढून घेतले तसेच शिवीगाळ केली.

यानंतर फिर्यादी रूपाली वायदंडे या आरोपीस जाब विचारण्यासाठी गेल्या असता आरोपी पियुष घोडके याने त्यांना अश्लील शिवीगाळ करून दमदाटी केली. तसेच कोयता दाखवून जीवे ठार मारण्याची धमकी दिली आणि मोबाईलमध्ये शूटिंग करण्याचीही धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणातील आरोपी पियुष बाळासाहेब घोडके यास पोलिसांनी ताब्यात घेतले असून पुढील तपास पोहेकॉ. आप्पा तरटे हे करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलूबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे तसेच पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि. गणेश अहिरे, पोउनि. सचिन लिमकर, पोकॉ. संदीप राऊत, पोकॉ. महादेव कोहक, पोकॉ. विवेक दळवी आणि मपोकॉ. प्रमिला उबाळे यांनी केली.

## पाथर्डी पालिका इमारतीची लिफ्ट बंद, पिण्याच्या पाण्याची सुविधा नाही

### दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक व महिलांना होत आहेत हाल । दुर्लक्ष झाल्यास आंदोलनाचा इशारा

**● पाथर्डी । वीरभूमी–**

पाथर्डी नगरपरिषदेची नव्याने उभारण्यात आलेली सुसज्ज व भव्य प्रशासकीय इमारत नागरिकांच्या सेवेसाठी सुरू करण्यात आली असली, तरी इमारतीतील मूलभूत सुविधांच्या अभावामुळे नागरिकांसह कर्मचारी वर्गाला मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचा आरोप तालुका अपंग संघटनेने केला आहे. या संदर्भात संघटनेचे अध्यक्ष हाजी हुमायूनभाई आतार यांनी नगरपरिषद प्रशासनाकडे निवेदन देऊन तातडीने आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, नगरपरिषदेच्या तीन ते चार मजली इमारतीत लिफ्टची व्यवस्था करण्यात आली असली, तरी ती सध्या बंद अवस्थेत आहे. त्यामुळे विविध कामांसाठी नगरपरिषद कार्यालयात येणारे दिव्यांग बांधव, ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच कर्मचारी यांना वरच्या मजल्यांवर जाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. विशेषतः दिव्यांग व्यक्ती व वृद्ध नागरिकांना जिने चढताना गंभीर अडचणींचा सामना करावा लागत असून त्यांचे हाल होत आहेत.



तसेच इमारतीतील जिन्यांच्या पायऱ्यांना आधारासाठी आवश्यक रेलिंग अथवा सुरक्षित पकड व्यवस्था अपुरी असल्याने अपघाताची शक्यता वाढली आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ही बाब अत्यंत गंभीर असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

याशिवाय, नगरपरिषद इमारतीत नागरिक व कर्मचाऱ्यांसाठी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसल्याची तक्रारही करण्यात आली आहे. अनेकदा नागरिकांना कार्यालयीन कामकाजासाठी तासन्तास थांबावे लागते; मात्र त्यांच्यासाठी मूलभूत सुविधांची कमतरता जाणवत असल्याचे संघटनेने म्हटले आहे.

दरम्यान, वीजपुरवठा खंडित झाल्यास पर्यायी वीज बॅकअपची व्यवस्था नसल्याने कार्यालयीन कामकाज ठप्प होते. नागरिकांना तसेच कर्मचाऱ्यांना दीर्घकाळ वीजपुरवठा सुरू होण्याची प्रतीक्षा करावी लागत असून, त्यामुळे कामांमध्ये विलंब होऊन गैरसोय निर्माण होत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

अपंग बांधव, ज्येष्ठ नागरिक व महिला भगिनींच्या सोयीसाठी लिफ्ट तातडीने सुरू करणे, सुरक्षित रेलिंग बसविणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे आणि वीज बॅकअप उपलब्ध करून देणे या मागण्या प्रशासनाने त्वरित पूर्ण कराव्यात, अशी मागणी हाजी हुमायूनभाई आतार यांनी केली आहे.

मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास अपंग बांधवांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशाराही तालुका अपंग संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

# मोदींच्या विकासदृष्टीला नवी गती; पुणे-शिर्डी रेल्वेसेवेचे सुजय विखे पाटलांकडून स्वागत

### पुणे-अहिल्यानगर-शिर्डी थेट रेल्वेमुळे भाविक, विद्यार्थी, रुग्ण व व्यावसायिकांना मोठा दिलासा

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

पुणे ते शिर्डी दरम्यान पहिल्यांदाच थेट रेल्वेसेवा सुरू होत असून, यामुळे साईभक्तांसह हजारो प्रवाशांचा प्रवास अधिक सोयीचा होणार आहे. केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या उपस्थितीत आज बुधवारी (१७ जून) या नव्या रेल्वेसेवेचे उद्घाटन करण्यात आले.

भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी या निर्णयाचे स्वागत करत पंतप्रधान नरेंद्र मोदी, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले. शिर्डी हे देशातील प्रमुख धार्मिक तीर्थक्षेत्रांपैकी एक असून, पुण्याहून सुरू झालेल्या या पहिल्या थेट रेल्वे सुविधेमुळे लाखो भाविकांची मोठी सोय होणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच या रेल्वेमुळे धार्मिक पर्यटनालाही चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात पायाभूत सुविधा विकासाला मोठी गती मिळाली आहे. गेल्या काही वर्षांत रेल्वे क्षेत्रात अभूतपूर्व बदल घडून आले असून, नवीन रेल्वेमार्ग, आधुनिक स्थानके, वंदे भारतसारख्या अत्याधुनिक गाड्या आणि प्रवाशांसाठी वाढलेल्या सुविधांमुळे भारतीय रेल्वेचा चेहरामोहरा बदलत आहे. पुणे-शिर्डीसारख्या महत्त्वाच्या मार्गांवर थेट रेल्वेसेवा उपलब्ध करून देणे हे केंद्र



सरकारच्या विकासाभिमुख धोरणाचे प्रतीक असल्याचे त्यांनी नमूद केले.

ते पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली धार्मिक, शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या महत्त्वाच्या शहरांना जोडण्यावर विशेष भर दिला जात आहे. पुणे-अहिल्यानगर-शिर्डी रेल्वेसेवा ही त्याच दृष्टीकोनाचा भाग असून, यामुळे भाविक, विद्यार्थी, रुग्ण आणि व्यावसायिकांना मोठा फायदा होणार आहे. रेल्वे नेटवर्कच्या विस्तारामुळे पर्यटन, व्यापार आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळत असून विकसित भारताच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल असल्याचेही त्यांनी सांगितले.

दररोज धावणारी ही रेल्वे पुणे, अहिल्यानगर, राहुरी आणि श्रीरामपूर मार्गे शिर्डीपर्यंत धावणार आहे. त्यामुळे केवळ भाविकांच्याच नव्हे, तर विद्यार्थी, रुग्ण आणि व्यावसायिकांच्याही प्रवासाचा वेळ आणि खर्च कमी होणार आहे. पुण्यातील शैक्षणिक व वैद्यकीय सुविधांपर्यंत पोहोचणे अहिल्यानगर आणि शिर्डी परिसरातील नागरिकांसाठी अधिक सुलभ होणार आहे.

यापूर्वी पुण्याहून शिर्डीसाठी थेट आणि नियमित रेल्वेसेवा उपलब्ध नव्हती. त्यामुळे प्रवाशांना बस किंवा खासगी वाहनांचा पर्याय स्वीकारावा लागत होता. नव्या रेल्वेसेवेमुळे प्रवास अधिक सुरक्षित, आरामदायी आणि किफायतशीर होणार आहे.

दरवर्षी देश-विदेशातून लाखो भाविक साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत येतात. अशा परिस्थितीत पुणे-शिर्डी थेट रेल्वेसेवा सुरू झाल्याने धार्मिक पर्यटन, व्यापार, दळणवळण आणि प्रादेशिक विकासाला मोठी गती मिळणार असल्याचे मानले जात आहे.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

### मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी

# शेवगावच्या गटविकास अधिकाऱ्यांना तालुक्यातील सरपंचांचा पाठिंबा

## शेवगाव तालुक्यातील विद्यमान सरपंच, उपसरपंच, सदस्यांचे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाची शेवगाव तालुक्यात यशस्वी अंमलबजावणी केल्याबद्दल तालुक्यातील विद्यमान सरपंच, उपसरपंच, सदस्य तसेच विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांना निवेदन सादर करून गटविकास अधिकारी श्रीमती सोनल शहा आणि केज (जि. बीड) येथील गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे यांच्यावरील आरोपांना विरोध दर्शवत त्यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास व्यक्त केला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, राज्य शासनाने यंदापासून सुरू केलेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानात शेवगाव तालुक्यातील सुमारे २० ग्रामपंचायतींनी सहभाग नोंदविला. गटविकास अधिकारी श्रीमती सोनल शहा यांच्या मार्गदर्शनाखाली या ग्रामपंचायतींनी अभियानाची प्रभावी अंमलबजावणी केली.

अभियानाच्या कालावधीत श्रीमती शहा यांनी विविध ग्रामपंचायतींना प्रत्यक्ष भेटी देऊन अभियानाची उद्दिष्टे, अंमलबजावणीची पद्धत आणि गुणवत्तापूर्ण कामकाजाबाबत सातत्याने मार्गदर्शन केले. तालुकास्तरीय पाहणी समितीने सहभागी ग्रामपंचायतींची सखोल पाहणी करून पारदर्शक पद्धतीने मूल्यांकन केल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

तथापि, निकाल जाहीर झाल्यानंतर काही व्यक्तींनी वैयक्तिक स्वार्थातून शेवगाव व केज येथील गटविकास अधिकाऱ्यांवर बिनबुडाचे आरोप केल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. कोणत्याही अधिकाऱ्याने पुरस्कार मिळवून देण्यासाठी सरपंचांकडे आर्थिक मागणी केली नसून, गुणवत्तापूर्ण काम करणाऱ्या ग्रामपंचायतींनाच पुरस्कार मिळावा, हीच त्यांची भूमिका असल्याचे निवेदनकर्त्यांनी स्पष्ट केले आहे.

राज्य शासनाने अभियानाचे पुनर्मूल्यांकन करण्याचा निर्णय घेतला असून, यासाठी नव्याने समिती नेमण्यात येणार आहे. अशा परिस्थितीत संबंधित समितीसमोर आपली बाजू मांडणे अपेक्षित असताना काही व्यक्तींकडून समाजमाध्यमे, इलेक्ट्रॉनिक आणि प्रिंट मीडियामध्ये खोटे आरोप केले जात असल्याची खंतही निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे.

कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांच्या पाठीशी प्रशासनाने ठामपणे उभे राहावे तसेच भविष्यात अशा प्रकारच्या बिनबुडाच्या आरोपांवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष संजय कोळगे, ढोरजळगावचे सरपंच डॉ. सुधाकर लांडे, जोहरापूरचे सरपंच रोहन दिलीपराव लांडे, भाजप युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष अण्णासाहेब ढोके, दहीगावचे सरपंच रामेश्वर भापकर, वरखेडचे सरपंच परमेश्वर तेलोरे, एरंडगावचे सरपंच संतोष धस, बऱ्हाणपूरचे सरपंच सुभाष वाणी, ठाकूरपिंपळगावचे सरपंच संजय खेडकर, गोळेगावचे सरपंच संजय आंधळे, लाडजळगावचे सरपंच अंबादास ढाकणे, देविदास आव्हाड, प्रदीप काळे, सुरज घोरपडे, तात्याबा तुतारे, राजेंद्र देशमुख, रोहन साबळे, दादासाहेब निकम, किशोर सोंडे, घनश्याम फुंदे, किशोर वाणी, रामकिसन मडके, दिलीपराव आव्हाड, राहुल सातपुते, संदीप आव्हाड, आप्पासाहेब सांगळे,



संदीप आव्हाड, संतोष धस यांच्यासह अनेक सरपंच, उपसरपंच आदी उपस्थित होते.

सरपंच उपसरपंच सदस्यांनी सदर निवेदन देताना आपल्या भावना व्यक्त करताना असे सांगितले की, जर संपूर्ण राज्यामध्ये पुनर्मूल्यांकन होणार आहे तर त्यासमोर आपण जाणे गरजेचे आहे आपण त्यासमोर न जाता बिनगुडाचे आरोप अधिकाऱ्यांवरती करणे हे कितपत योग्य आहे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी सांगितले की, शेवगाव च्या गटविकास अधिकारी यांचे कामकाज अतिशय चांगले असून आम्ही प्रशासन म्हणून त्यांच्या समवेत आहोत.

या अभियानाला मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान असे नाव आहे असे असताना रेड्याच्या अंगावर 'पांचट राज अभियान' असा उल्लेख करणे हे भाजपचे विद्यमान पदाधिकारी व आपल्याच सरकारविरोधात मुख्यमंत्री यांचे नावाने अभियानाचा अवमान करणे हे योग्य नाही.

---

# वाघुंडे बुद्रुकच्या जलजीवन योजनेत भ्रष्टाचाराचा आरोप

### चार वर्षांनंतरही 'हर घर जल' अपूर्ण । दोषींवर कारवाईची काँग्रेस कामगार सेनेची मागणी

**● पारनेर । वीरभूमी–**

पारनेर तालुक्यातील वाघुंडे बुद्रुक येथे केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'जलजीवन मिशन' योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला असून, गेल्या चार वर्षांपासून ग्रामस्थांना हक्काच्या पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकावे लागत असल्याची तक्रार पुढे आली आहे. या योजनेत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत काँग्रेस कामगार सेनेचे तालुकाध्यक्ष रविश रासकर यांनी सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. प्रशासनाने दहा दिवसांत योग्य कार्यवाही न केल्यास जिल्हा परिषद कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.



वाघुंडे बुद्रुक गावात ९ जून २०२२ रोजी जलजीवन योजनेच्या कामास सुरुवात झाली होती. या योजनेची पूर्तता करण्यासाठी ८ जून २०२३ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली होती. मात्र, मुदत संपून एक वर्ष उलटल्यानंतरही गावात 'हर घर जल' योजनेअंतर्गत पाणीपुरवठा सुरू झालेला नाही. ग्रामपंचायतीने ग्रामस्थांकडून नळ जोडणीसाठी प्रत्येकी दोन हजार रुपये अनामत रक्कम म्हणून जमा करून घेतली होती. पैसे भरून चार वर्षे उलटूनही नळांना पाणी न आल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे.

सध्या गावात दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली असून, गेल्या दोन ते तीन महिन्यांपासून ग्रामस्थांना टँकरद्वारे पाणी विकत घ्यावे लागत आहे. एकीकडे नागरिक नियमितपणे पाणीपट्टी भरत असताना दुसरीकडे हक्काचे पिण्याचे पाणी मिळत नसल्याची खंत ग्रामस्थांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

या संपूर्ण योजनेचे तांत्रिक व आर्थिक लेखापरीक्षण (ऑडिट) करण्यात यावे तसेच दोषी ठेकेदार आणि संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी रविश रासकर यांनी पंचायत समिती तसेच जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाकडे दिलेल्या निवेदनातून केली आहे.

दहा दिवसांच्या आत योजनेचे ऑडिट पूर्ण करून गावातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आला नाही, तर जिल्हा परिषद, अहिल्यानगर येथे बेमुदत आमरण उपोषण करण्यात येईल. या आंदोलनादरम्यान उद्भवणाऱ्या परिस्थितीची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील, असा स्पष्ट इशारा रविश रासकर यांनी दिला आहे. दरम्यान, या मागणीचे निवेदन देताना रविश रासकर यांच्यासमवेत ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# मृग नक्षत्र संपत आले, तरी पावसाचा पत्ता नाही; पाथर्डी तालुक्यातील शेतकरी चिंतेत

**● पाथर्डी । वीरभूमी–**

जून महिन्याचा अर्धा कालावधी उलटून गेला असून मृग नक्षत्रही जवळपास संपत आले आहे. मात्र, अद्याप एकही थेंब पाऊस न झाल्याने पाथर्डी तालुक्यातील शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. शेतीची नांगरणी, वखरणी, मशागत आदी पूर्वतयारीची सर्व कामे पूर्ण करून शेतकरी पेरणीसाठी सज्ज असला, तरी पावसाने हुलकावणी दिल्याने शेतकरीराजा आभाळाकडे डोळे लावून बसला आहे.



तालुक्यातील बहुतांश शेती ही पावसावर अवलंबून असल्याने खरीप हंगामासाठी वेळेत पाऊस होणे अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. यंदा मात्र पावसाचे आगमन लांबल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. अनेक शेतकऱ्यांनी बी-बियाणे, खते आणि इतर कृषी साहित्याची खरेदी करून ठेवली आहे. त्यामुळे पाऊस उशिरा झाल्यास या गुंतवणुकीवरही परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

हवामान तज्ज्ञांकडून आणि प्रशासनाकडून एल निनोच्या पार्श्वभूमीवर पावसाचे आगमन उशिरा होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. या अंदाजामुळे शेतकऱ्यांच्या चिंतेत आणखी भर पडली आहे. विशेषतः मुग, उडीद, तूर आणि सोयाबीन यांसारख्या खरीप हंगामातील महत्त्वाच्या नगदी व कडधान्य पिकांच्या पेरणीसाठी योग्य वेळ निघून जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मृग नक्षत्रात झालेली पेरणी या पिकांच्या उत्पादनवाढीस पोषक मानली जाते. त्यामुळे पाऊस आणखी लांबल्यास उत्पादनात घट होऊन आर्थिक फटका बसण्याची भीती शेतकरी व्यक्त करीत आहेत.

दरम्यान, वाढते तापमान, कोरडी जमीन आणि ओलाव्याचा अभाव यामुळे शेतीची कामे पूर्णपणे ठप्प झाली आहेत. पावसाअभावी भविष्यात जनावरांच्या चाऱ्याचा तसेच पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

गेल्या काही वर्षांपासून बदलत्या हवामानामुळे शेतीसमोरील आव्हाने वाढत असताना, यंदाही पावसाची अनिश्चितता शेतकऱ्यांसाठी चिंतेचा विषय ठरत आहे. पाऊस पुरेसा न झाल्यास खरीप हंगामावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.

सध्या मात्र पाथर्डी तालुक्यातील शेतकरी पावसासाठी आशेने आभाळाकडे पाहत असून, चांगल्या पावसासाठी देवाकडे प्रार्थना करत आहे. आगामी काही दिवसांत पाऊस बरसावा आणि खरीप हंगामाला सुरुवात व्हावी, हीच तालुक्यातील शेतकरी बांधवांची अपेक्षा आहे.

---

# खून करून पुरावा नष्ट करण्यासाठी अल्पवयीन मुलीचा मृतदेह जाळणाऱ्या आरोपीसह वडिलांना अटक

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

श्रीगोंदा शहरातील काळकाई चौक परिसरात अल्पवयीन मुलीचा खून करून तिचा मृतदेह जाळून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीसह त्याच्या वडिलांना श्रीगोंदा पोलिसांनी अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक १५ जून २०२६ रोजी दुपारी २ ते ३ वाजण्याच्या सुमारास आरोपी शुभम सुखदेव ओव्हाळ (रा. काळकाई चौक, श्रीगोंदा) आणि मृत अल्पवयीन मुलगी यांच्यात चारित्र्याच्या संशयावरून वाद झाला. या वादातून संतापलेल्या शुभम ओव्हाळ याने लोखंडी रॉड व फरशीच्या साहाय्याने मुलीवर गंभीर मारहाण केली. डोक्यात वार करून तिचा खून करण्यात आला.




खून केल्यानंतर आरोपीने मृतदेह घरातच ठेवला आणि केडगाव (ता. अहिल्यानगर) येथे राहणाऱ्या आपल्या आई-वडिलांकडे जाऊन घटनेची माहिती दिली. त्यानंतर दिनांक १६ जून रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास आरोपी शुभम ओव्हाळ व त्याचे वडील सुखदेव ओव्हाळ हे श्रीगोंदा येथे आले. त्यांनी मृतदेह गादीत गुंडाळून दोरीने बांधला.

यानंतर दिनांक १७ जून रोजी मध्यरात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास दोघांनी मोटारसायकलवरून मृतदेह वडाळी रोड परिसरातील जंगलात नेला. तेथे लाकडे गोळा करून पेट्रोल टाकून मृतदेह जाळून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

दरम्यान, मृत मुलीच्या आईने श्रीगोंदा पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्यानंतर गु.र.नं. ६१०/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १०३, ३(५), २३८, ६४ तसेच पोक्सो कायदा कलम ३ व ४ आणि अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी पहाटे घटनास्थळी धाव घेतली असता वडाळी रोड जंगल परिसरात मृतदेह जळत असल्याचे आढळून आले. त्यानंतर आरोपी शुभम सुखदेव ओव्हाळ व सुखदेव ओव्हाळ (दोघे रा. काळकाई चौक, श्रीगोंदा) यांना त्यांच्या राहत्या घरातून ताब्यात घेण्यात आले. सदर गुन्ह्याचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे हे करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलूबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे तसेच पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश अहिरे, सचिन लिमकर, उपनिरीक्षक प्रवीण पाटील, पोकॉ. सचिन लोळगे (कोतवाली पोलीस स्टेशन), पोकॉ. संदीप राऊत, संदीप शिरसाठ, राहुल मोढळे, नय्युम पठाण, आनंद मैड, विवेक दळवी व चालक श्री. साळवे यांनी पार पाडली.

---

## अनिकेत गाडेकर यांची इन्फंट्री शाखेत लेफ्टनंटपदी नियुक्ती

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

अहिल्यानगरच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवणारी अभिमानास्पद कामगिरी करत राघवेंद्र स्वामी नगर, बोल्हेगाव फाटा येथील चि. अनिकेत शिवाजी गाडेकर यांनी भारतीय सैन्य दलाच्या इन्फंट्री शाखेत लेफ्टनंटपदाची नियुक्ती मिळवली आहे.

अनिकेत गाडेकर यांनी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी, खडकवासला येथे तीन वर्षांचे तसेच भारतीय लष्कर अकादमी, देहराडून येथे एक वर्षाचे प्रशिक्षण पूर्ण केले. भारतीय सैन्य दलाच्या १४८ व्या कोर्सचे प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर, १३ जून २०२६ रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते त्यांना लेफ्टनंट पदाची मानाची पदवी प्रदान करण्यात आली.

यावेळी त्यांचे वडील श्री. शिवाजी गाडेकर आणि आई सौ. सुनीता गाडेकर यांचा भारतीय लष्कराकडून गौरवपदक देऊन सन्मान करण्यात आला.



लहानपणापासून भारतीय सैन्य दलात अधिकारी होऊन देशसेवा करण्याचे ध्येय बाळगणाऱ्या अनिकेत यांनी अवघ्या २३ व्या वर्षी आपले स्वप्न साकार केले. त्यांच्या या यशामागे कुटुंबीयांचे मोलाचे सहकार्य लाभले.

सामान्य कुटुंबात जन्मलेल्या अनिकेत गाडेकर यांनी भारतीय सैन्य दलात वर्ग-१ अधिकारी होण्याचा मान मिळवत आपल्या आई-वडिलांच्या कष्टाचे चीज केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच राजकीय, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील विविध स्तरांतून लेफ्टनंट अनिकेत शिवाजी गाडेकर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, सर्व स्तरांतून त्यांचे कौतुक करण्यात येत आहे.

---

# पारनेर-सुपा राज्य महामार्गाच्या रुंदीकरणामुळे स्थानिक व्यावसायिक व रहिवासी चिंतेत

## गावठाण हद्दीतील रस्त्याच्या रुंदीबाबत पुनर्विचाराची मागणी । २४ जूनला खासदार निलेश लंके यांच्यासमवेत बैठक

**● पारनेर । वीरभूमी–**

पारनेर शहरातून जाणाऱ्या पारनेर-सुपा-सारोळा (राज्य महामार्ग क्र. ६९) या रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम प्रस्तावित करण्यात आले आहे. मात्र, या कामाच्या नियोजनामुळे शहरातील मुख्य रस्त्यालगत असलेल्या अनेक व्यावसायिक आणि रहिवाशांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाल्याने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अधिकारी वसईकर यांना लेखी निवेदन देण्यात आले आहे.

स्थानिक पातळीवर दिसून येणाऱ्या विसंगती लक्षात घेऊन गावठाण हद्दीतील रस्त्याच्या रुंदीकरणाबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने पुनर्विचार करावा, अशी मागणी संभाजीनगर परिसरातील नागरिकांनी निवेदनाद्वारे केली आहे.

रस्त्याच्या कामाची पाहणी केली असता, परिधान कलेक्शन या दुकानापासून पुढे रस्त्याची रुंदी अचानक वाढविण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. शहराच्या मुख्य बाजारपेठेत आधीच जागेची कमतरता असताना नवीन नियोजनानुसार रस्त्याचे रुंदीकरण झाल्यास अनेक वर्षांपासून व्यवसाय करणाऱ्या छोट्या-मोठ्या व्यापाऱ्यांसह अनेक कुटुंबांच्या घरांवर गदा येण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

शहरातील अंतर्गत रस्त्यांची स्थिती पाहता जागा आधीच अपुरी आहे. अशा परिस्थितीत अनावश्यक किंवा विसंगत रुंदीकरणामुळे अनेकांना बेघर होण्याची वेळ येऊ शकते, अशी भावना स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे.

याबाबत नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पारनेर येथील उपविभागीय अभियंत्यांकडे लेखी अर्ज सादर केला आहे. या अर्जात शहराच्या गावठाण क्षेत्रात सध्या अस्तित्वात असलेली रस्त्याची रुंदी ग्रामीण रुग्णालयाच्या हद्दीपर्यंत कायम ठेवावी, अशी मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे रहिवाशांच्या मालमत्तेचे नुकसान टळेल आणि वाहतुकीचाही प्रश्न सुटण्यास मदत होईल, असे नागरिकांचे म्हणणे आहे.



या निवेदनाच्या प्रती पारनेर नगरपंचायतीचे नगराध्यक्ष आणि मुख्याधिकारी यांनाही देण्यात आल्या आहेत. शहरातील नागरिक आणि व्यावसायिकांच्या भावना लक्षात घेऊन प्रशासनाने या कामाचा सविस्तर आढावा घेऊन तांत्रिक बाबींचा विचार करावा आणि स्थानिकांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. आता सार्वजनिक बांधकाम विभाग या मागणीवर काय निर्णय घेतो आणि रस्त्याच्या रुंदीकरणाचा पेच कसा सोडवतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### लेखी तक्रारीसह बैठकीला उपस्थित रहावे

■ पारनेर-सुपा राज्य महामार्गाच्या रुंदीकरणासंदर्भात येत्या २४ जून रोजी खासदार निलेश लंके यांच्या उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात आली आहे. संभाजीनगर परिसरातील नागरिकांनी आपल्या लेखी तक्रारींसह या बैठकीला उपस्थित राहावे, असे आवाहन सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता वसईकर यांनी केले आहे. शहराच्या विकासकामांसाठी स्थानिक नागरिकांनी समन्वयाने सहकार्य करावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.